**शिक्षित करा!** **संघटित करा!!** **संघर्ष करा!!!**

# भारत मुक्ती मोर्चा



केंद्रीय कार्यालय:– 5709/80, रैगरपूरा, करोलबाग, नवी दिल्ली–110 005. दूरध्वनी–9868118586, 9415305602

## जातीनिहाय जनगणना आणि ओबीसींची जातीनिहाय जनगणना न करण्याच्या विरोधात दिनांक 21 ऑगस्ट, 2011 रोजी 29 राज्यात, 511 जिल्ह्यात आणि 3500 तालुक्यांमध्ये रॅली, मोर्चा व

## दिनांक 1 सप्टेंबर, 2011 रोजी सकाळी 11 वा. राष्ट्रव्यापी महारॅली

## स्थळ : रामलिला मैदान, नवी दिल्ली

| | | |
|---|---|---|
| उद्घाटक | : | **मा. एच.डी.देवेगौडा** (माजी प्रधानमंत्री) |
| विशेष अतिथी | : | **मा. शरद यादव** (राष्ट्रीय अध्यक्ष, जनता दल युनायटेड, राष्ट्रीय संयोजक एन.डी.ए.) |
| | : | **मा. रामविलास पासवान** (खासदार आणि राष्ट्रीय अध्यक्ष, लोक जनशक्ती पार्टी) |
| | : | **मा. गोपीनाथ मुंडे** (खाजदार आणि घुमंतु जातींचे नेता, महाराष्ट्र) |
| | : | **मा. रघू ठाकूर** (मागासवर्गीय नेता, राष्ट्रीय अध्यक्ष लोकतांत्रिक समाजवादी पार्टी) |
| प्रमुख उपस्थिती | : | मा. राणेंद्र सौई (माजी केबिनेट मंत्री, ओरिसा) |
| | : | मा. कॅप्टन जयनारायण निषाद (खासदार, बिहार) |
| | : | मा. सत्यपाल चौधरी (राष्ट्रीय अध्यक्ष, किसान लिबरेशन फ्रंट) |
| | : | मा. जयनारायण चोकसे (राष्ट्रीय अध्यक्ष, भारतीय हयहय कल्चोरी कलार, समाज म.प्र.) |
| | : | मा. हुकूमसिंग देशराजन लोधी (राष्ट्रीय महासचिव, भारतीय लोधी महासभा) |
| | : | मा. इंद्रराजसिंग सैनी (राष्ट्रीय अध्यक्ष, भारतीय सैनी सेवा समाज, नवी दिल्ली) |
| | : | मा. यशपाल मलिक (राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल भारतीय जाट आरक्षण संघर्ष समिती) |
| | : | मा. डॉ. एम. ऐजाज अली (राष्ट्रीय अध्यक्ष ऑल इंडिया युनाईटेड मुस्लीम मोर्चा, बिहार) |
| | : | मा. अखिलेश कटियार (कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष, शोषित समाज दल) |
| | : | मा. शिवदान मेघवाल (सामाजिक कार्यकर्ता, राजस्थान) |
| | : | मा. प्रो. गुरुनाम सिंग मुक्तसर (पंजाब) |

## अध्यक्षता :– मा. वामन मेश्राम (राष्ट्रीय अध्यक्ष, भारत मुक्ती मोर्चा)

**१) जातीनिहाय जनगणना करण्यासाठी संसदेमध्ये सर्वानुमते सहमती:–दि.**6 आणि 7 मे, 2010 रोजी लोकसभेमध्ये जातीनिहाय जनगणना करण्याचे ठरले होते. सर्वच राजकीय पक्षांनी लोकसभेमध्ये 9 फेब्रुवारी, 2011 ला होणाऱ्या जातीनिहाय जनगणनेला आधार बनवून गणना केली जाईल, यावर सर्वच राजकीय पक्षांचे एकमत झाले होते.

**२) सर्वानुमते झालेल्या सहमतींचे उल्लंघन:–** 9 फेब्रुवारी, 2011 ला केंद्र सरकारने जेव्हा जनगणना सुरु केली तेव्हा जनगणनेमध्ये जातींची गणना करण्याचे नाकारले आणि असे करुन लोकसभेमध्ये जी सहमती दर्शविली होती त्या सर्व सहमतीचे केंद्र सरकारने उल्लंघन केले, ही गंभीर बाब आहे.

**३) जनगणना 1 जूनपासून होईल हे सरकारचे आश्वासन:–**केंद्र सरकारने लोकांच्या दबावामुळे 1 जून, 2011 पासून जनगणना केली जाईल असे आश्वासन दिले होते. त्याकरिता केंद्र सरकारने मे महिन्यामध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन घोषणा केली होती. परंतु 1 जूनपासून सरकारने जनगणना सुरुच केली नाही. आम्ही देशभरातून जनगणनेच्या संदर्भात माहिती गोळा केली तेव्हा आमच्या असे लक्षात आले की, कोणत्याही राज्यामध्ये आणि जिल्ह्यामध्ये जनगणना होत असल्याचे आढळून आलेले नाही. एवढेच नव्हे तर 1 जूनपासून जनगणना सुरु झाली असे कुठल्याच वर्तमान पत्रात बातमीसुद्धा पहावयास मिळालेली नाही. यावरुन असे सिद्ध होते की, केंद्र सरकार जातीनिहाय जनगणना करण्यास इच्छुक नाही.

**४) केंद्र सरकारची धोकेबाजी:–** 6 आणि 7 मे, 2010 ला लोकसभेमध्ये सर्वानुमते निर्णय पारित झाल्यानंतर प्रणव मुखर्जींने बायोमेट्रिक पद्धतीने जनगणना करण्याचे ठरविले, ही सरकारची धोकेबाजी होती. बायोमेट्रिक पद्धतीने करण्यात येणाऱ्या जनगणनेमध्ये 14 वर्षाच्या खालील मुला–मुलींची गणना होणार नाही. याला आपण जनगणना म्हणू शकत नाही. यावर लोकसभेमध्ये फार मोठा वाद निर्माण झाला होता आणि केंद्र सरकारला ही घोषणा मागे घ्यावी लागली. दि. 9 फेब्रुवारी, 2011 पासून जनगणना केली जाईल असे घोषित केले होते. परंतु तेही केले नाही आणि पुढच्या वेळेस जातीनिहाय जनगणना होईल. परंतु नरेगाच्या कामगारांद्वारे गणना केली जाईल आणि त्यामध्ये कागद, पेन, पेन्सिल यांचा उपयोग केला जाणार नाही. आकड्यांच्या पडताळ–णीसाठी कुठलेही दस्तऐवजी प्रमाण नसेल. ही गणना जनगणना नियम 48 नुसार करण्यात येणार नाही आणि यामध्ये केवळ गरिबीचे आकडे एकत्र केले जातील. त्यामध्ये सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक आकडे एकत्रित केले जाणार नाहीत असे सरकारच्या घोषणा पत्रावरुन सिद्ध होते. यावरुन असे सिद्ध होते की, सरकारने जातीनिहाय जनगणना गिणती सोबत धोकेबाजी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. (५) ओबीसींची जातीनिहाय जनगणना न करण्याच्या षड्यंत्रकारीनीतिचा धिक्कार. (६)जातीनिहाय जनगणना न करण्याच्या नीतीचा धिक्कार. (७) ओबीसींवर क्रिमिलेअर लादून संविधानिक अधिकारांपासून वंचित ठेवण्याच्या नीतीचा धिक्कार. (८) विदेशी विद्यापीठे तसेच विदेशी खाजगी विद्यालये भारतात आणून मूलनिवासी बहुजनांना शिक्षणापासून वंचित करण्याच्या नीतीचा धिक्कार. (९) ३८ कोटी (अनुसूचित जाती, जनजाती, ओबीसी आणि धर्मपरिवर्तीत) मूलनिवासी बहुसंख्यांक असणाऱ्या लोकांना भूकबळीच्या स्तरावर पोहचविणाऱ्या नीतीचा धिक्कार. (१०) शेतकऱ्यांची जमीन विशेष आर्थिक क्षेत्राच्या नावाखाली हडपण्याच्या नीतीचा धिक्कार. (११) सरकारद्वारे आरक्षणामध्ये पदोन्नती समाप्त करण्याच्या नीतीचा धिक्कार. (१२) रेणके आयोग लागू करुन एनटी.,डीएनटी, व्हीजेएनटी आणि एससी, एसटी, समुदायामध्ये भांडणे लावण्याच्या नीतीचा धिक्कार. (१३) भारतामध्ये जवळपास २२ कोटी वेंडर, फेरीवाले, भाजीवाले, खोकेवाले, पटरीवाले लोक आपला उदरनिर्वाह करणारे मूलनिवासी बहुजन समाजातील लोकांना बेकारी आणि असहाय्य करणाऱ्या नीतीचा धिक्कार. (१४) निवडणुकीनंतर सच्चर कमिशन लागू न करणे हे शासक जातीकडून मुसलमानांसोबत धोकेबाजी करण्याच्या नीतीचा धिक्कार. (१५) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसींना अन्य राज्यामध्ये जात प्रमाणपत्र न देण्याच्या नीतीचा धिक्कार. (१६) महिलांना आरक्षणाच्या नावावर सबलीकरण नव्हे तर संपूर्ण महिलांना गुलाम करण्याच्या नीतीचा धिक्कार.

या गोष्टी लक्षात घेता **सरकारच्या धोकेबाजीच्या विरोधामध्ये राष्ट्रव्यापी विरोध करण्यासाठी दि. 21 ऑगस्ट, 2011 रोजी 29 राज्यांत, 511 जिल्ह्यात, 3500 तालुक्यामध्ये रॅली, मोर्चाचे आयोजन केले जाईल. आणि राष्ट्रीयस्तरावर दि. 1 सप्टेंबरला रामलिला मैदान, नवी दिल्ली येथे महारॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.** या रॅलीला यशस्वी करण्यासाठी तन–मन–धन देऊन सहकार्य करावे.

**निवेदक**

सुनिल बोरसे (राष्ट्रीय महासचिव व्यवस्थापन, भारत मुक्ती मोर्चा) मो.– 09425012851

ॲड. जोहर सिंग कश्यप (राष्ट्रीय महासचिव संघटन, भारत मुक्ती मोर्चा) मो.– 09415305602

अल्लाउद्दीन मकानदार (सदस्य राष्ट्रीय कार्यकारिणी, भारत मुक्ती मोर्चा) मो.– 09730484931

जितेंद्र कुमार (कार्यकारिणी सदस्य भारत मुक्ती मोर्चा) मो.–९९९९९२८८३४

printed @ chhatrapati printers ph - 02026812932